ई–फायलिंग

नि.दि.मु.नं. २३/२०२६

संजय धस वगैरे विरुध्द श्री.उल्हास नलवडे वगैरे

MHSN14-000104-2026

## नि.क्र. ५४ वरील आदेश

१. प्रतिवादी नं. १ व २ यांनी दि. १७/०३/२०२६ रोजी कोर्टानी केलेल्या तूर्तातूर्त ताकीदीचे हुकूमाची अंमलबजावणी व कार्यवाही अपिल मुदतीपर्यंत स्थगीत करण्याचा तसेच दावा मिळकतींमध्ये जैसे थे परिस्थिती ठेवणेचा आदेश करण्यात यावा म्हणून दिलेला आहे.

२. प्रतिवादींचे असे कथन आहे की, काल दि. १७/०३/२०२६ रोजी सायंकाळी ०५-३० वाजता मे.कोर्टाने नि.क्र. ५ वरील अर्जाचा न्यायनिर्णय केला असून अर्ज मंजूर करुन तूर्तातूर्त ताकीदीचा हुकूम केलेचे जाहीर केले. सदर हुकूमाची प्रत अद्याप मिळालेली नाही. प्रतिवादी सहिशिक्याची नक्कल मागणी योग्य त्या मुदतीत अपिल दाखल करणेची व्यवस्था करणार आहेत. प्रतिवादींविरुध्द एकतर्फा स्टेटस्को आदेश वेळोवेळी वाढविण्यात आला त्याचा गैरअर्थ काढून वादी प्रतिवादींना बेदखल करण्याची भाषा बोलून दाखवत आहेत व प्रतिवादींचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही म्हणून दावा मिळकतीची पूर्ण स्थिती बदलून टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. वादी व त्यांना सामील असलेल्या प्रतिवादींची संख्या लक्षात घेता ते प्रतिवादी नं. १ व २ यांना दावा मिळकतीतून बेदखल करतील अशी भिती वाटू लागली आहे. ते कोणत्याही क्षणी प्रतिवादींना मिळकतीतून बेदखल करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रतिवादींचे संभाव्य अपिल निष्फळ होऊ नये व मे. जिल्हा न्यायाधीश यांनी अंतरिम आदेश करेपर्यंत दावा मिळकतीची सद्यस्थिती जैसे थे रहावी म्हणून दि. १७/०३/२०२६ पर्यंत जो स्टेटस्को अंमलात ठेवला होता तो अपिल मुदतीपर्यंत पुढे चालू ठेवणेत येणे गरजेचे आहे. असा हुकूम झाली नाही तर प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होईल व त्यांना दावा मिळकतीचे कब्जास कायमचे मुकावे लागेल. त्यामुळे मे.कोर्टाचा मनाई आदेश स्थगीत करणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**३.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. १ व २ तर्फे प्रकरण बोर्डावर घेऊन दिलेला आहे. त्यामुळे वादींतर्फे कोणीही हजर नाही. प्रतिवादींतर्फे देखील कोणीही हजर नाही. त्यामुळे युक्तिवाद नाही. अर्जाची अर्जसी लक्षात घेता अर्ज उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे निर्णयासाठी घेण्यात आला. प्रकरणाचे अवलोकन करता असे दिसून येते की, तूर्तातूर्त ताकीद अर्जाचे निर्णयापर्यंत दावा मिळकतींमध्ये जैसे थे परिस्थिती ठेवणेबाबतचा आदेश अस्तित्वात होता. काल दि. १७/०३/२०२३ रोजी तूर्तातूर्त ताकीद अर्ज मंजूर करण्यात आला व प्रतिवादी नं. १ ते ६ यांनी दाव्याचा निर्णय होईपर्यंत उपअधिक्षक भूमी अभिलेख शिराळा यांचेकडून दावा क व ड मिळकतीबाबत स्वतंत्र पोटहिस्सा तयार करुन स्वतःच्या नावे ७/१२ तयार करु नये अशी त्यांना तूर्तातूर्त ताकीद देणेत आली. मात्र, सदर आदेशानंतर प्रतिवादींतर्फे स्थगीती अर्ज देण्यात आला नाही.

**४.** वादींचा तूर्तातूर्त ताकीद अर्ज हा प्रतिवादींचे म्हणणे घेऊन दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकून अभिलेखावरील कागदपत्रांची पाहणी करुन निर्णीत करण्यात आला आहे. त्यानुसार वादींचा तूर्तातूर्त ताकीद अर्ज मंजूर करण्यात आला आहे. निश्चितच प्रतिवादी यांना सदर अर्जावरील आदेशावर अपिल करण्याचा हक्क आहे. मात्र, सदर आदेश दोन्ही बाजुंना संधी देऊन गुणदोषावर निर्णीत केला असल्यामुळे प्रतिवादींचे अर्जाप्रमाणे स्थगीती आदेश केल्यास वादींचेवर अन्यायकारक होणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. करीता आदेश.

## <u>आदेश</u>

प्रतिवादी नं. १ व २ यांचा अर्ज नि.क्र. ५४ नामंजूर करण्यात येत आहे.

DESAI VINAYA ATMARAM
Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2026.03.18 17:35:41 +0530

(व्ही. ए. देसाई)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
शिराळा

शिराळा
दिनांक १८/०३/२०२६

# <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. S. Gondkar |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 18/03/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 18/03/2026 |
| Order uploaded on | : | 18/03/2026 |